( इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर )

**रूप डायमंड्ड आणि इतर**

विरुद्ध

**भारत सरकार आणि इतर**

२ जानेवारी १९८९

( सरन्यायाधीश आर. एस. पाठक आणि न्या. एम. एन. वेंकटचलिया )

भारतीय राज्यघटना, १९५०: अनुच्छेद ३२ आणि २२६ - आयात आणि निर्यात नियंत्रक - सहा अप्रमाणित परवान्यांचे पुनर्वैधीकरण आणि पुष्टी देण्यास नकार - रिट याचिका दाखल करण्यात स्पष्टीकरण न करता आलेला अत्याधिक विलंब – न्यायालय - हस्तक्षेप करण्यास नकार देऊ शकते का.

आयात-निर्यात धोरण, १९८२-८३ च्या उद्देशासाठी मान्यताप्राप्त निर्यात गृहांना अखंड आणि ओबडधोबड हिरे आयात करण्यासाठी सहा अग्रिम परवाने देण्यात आले होते, ज्यामध्ये भारतातून घडवलेले किंवा त्याचे अनेक छोट्या तुकड्यांमध्ये रूपांतरित केलेले आणि घासून लख्ख केलेले हिरे निर्यात करण्याची निश्चित निर्यात बांधिलकी पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यांनी आयात-निर्यात धोरण १९८२-८३ (एएम १९८३)च्या परिच्छेद १८५(४) अंतर्गत निर्धारित वेळेत ओजीएल वस्तूंसाठी नूतनीकरण आणि पुष्टी मागितले नाही. त्यांनी त्यांच्या निर्यात-बांधिलकी पूर्ण केल्यानंतर अनेक वर्षांनंतर, १९८६

मध्येच असे नूतनीकरण आणि त्यासंदर्भात पुष्टी मागितली. संयुक्त मुख्य आयात आणि निर्यात नियंत्रक यांनी ५.८.१९८६ आणि ९.४.१९८६ रोजी दिलेल्या दोन आदेशांमध्ये, नूतनीकरण आणि पुष्टी मागण्यास अत्यंत विलंब झाल्याच्या आणि दाव्याच्या गुणवत्ता आणि परवानगीच्या आधारे त्यांची मागणी नाकारली.

याचिकेत, याचिकाकर्त्यांनी या आदेशांना आव्हान दिले आहे की, उच्च न्यायालयाने पुनर्मान्यता देण्याच्या दृष्टीने इतर दोन निर्यात गृहांच्या याचिका स्वीकारल्याने आणि सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातील सरकारच्या विशेष अनुमती याचिका फेटाळल्याने अन्य दोन निर्यात गृहांना देण्यात आलेल्या इम्प्रेस्ट परवान्यांच्या नूतनीकरणाच्या अनुषंगाने, याचिकाकर्त्यांच्या समान नूतनीकरणासाठीच्या मागणीचा अधिकाऱ्यांकडून मिळाला होता आणि त्यामुळे त्यांच्या इम्प्रेस्ट परवान्यांच्या पुष्टी मुळे याचिकाकर्त्यांचा अशाच प्रकारच्या पुनर्वैधतेचा दावा अधिकाऱ्यांनी फेटाळून लावणे आणि त्यांना ( दुसऱ्यांना ) परवाने मंजूर करणे, हे भेदभावपूर्ण आणि कायद्याच्या कलम १४ चे उल्लंघन करणारे आहे कारण त्या प्रकरणांमध्ये अधिकाऱ्यांनी सादर केलेले नकाराचे कारणे याचिकाकर्त्यांच्या बाबतीत सादर केलेल्या कारणांशी अगदी सारखीच होती आणि त्या कारणांना नकाराला पाठिंबा देण्यासाठी कायद्यात अपुरा आधार असल्याचे आढळले होते आणि त्यातील एका प्रकरणात उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर पुनर्वैधतेची मागणी करणाऱ्या याचिकाकर्त्यांच्या बाबतीत कोणताही भेद करण्यास कोणताही आधार नव्हता.

रिट याचिका फेटाळताना

निष्कर्ष: याचिकाकर्ते असे दावे पुन्हा एकदा मांडत आहेत ज्याचा त्यांनी अनेक वर्षे पाठपुरावा केला नव्हता. ते सतर्क नव्हते परंतु निष्क्रिय राहण्यात समाधानी होते आणि दुसरा कोणीतरी निर्णय घेईपर्यंत बघ्याची भूमिका घेण्याचे त्यांनी निवडले. त्यांच्या प्रकरणाला त्या प्रकरणाच्या साद्दश्याने विचारात घेता येत नाही जेथे न्यायालयाने कोणत्याही कायद्याला घटनाबाह्य आणि निरर्थक घोषित केले आहे, जेणेकरून नंतर निरर्थक घोषित केलेल्या कायद्याच्या सक्तीनुसार भरण्यात आलेले पैसे परत मिळवता येतील. या याचिकाकर्त्यांच्या पहिल्या फेटाळणीनंतर जवळजवळ एक वर्षानंतर दाखल केलेल्या या याचिकेला अक्षम्य आणि स्पष्ट करू न शकण्याइतपत विलंब झालेला आहे , अत्यंत विलंब आहे. [१८ ब-क]

निर्णयासाठीच्या इतर कारणांच्या गुणवत्तेव्यतिरिक्त, नकाराची इतर कारणे कितीही योग्य असली तरी, अधिकाऱ्यांकडे दाव्यात आणि या न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात झालेला अवाढव्य विलंब हा स्वतःहूनच आम्हाला हस्तक्षेप करण्यास नकार देण्यास प्रवृत्त करणारा आहे.[१८ ई]

जर असा कोणताही अपिलाचा अधिकार उपलब्ध असेल, तर या रिट-याचिका फेटाळण्याच्या या आदेशामुळे अशा कोणत्याही अपीलात याचिकाकर्त्यांच्या प्रकरणावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

८. त्यानुसार, आम्ही हस्तक्षेप करण्यास नकार देतो आणि ही रिट याचिका फेटाळतो.

दुर्गा प्रसाद विरुद्ध मुख्य नियंत्रक, आय अँड ई, १९६९ (२) एस. सी. आर. ८६१, याचा संदर्भ

मूळ अधिकारिता

## रिट याचिका क्र. ४११ / १९८७

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत.

उपस्थित पक्षकारांसाठी टी. यू. मेहता, ए. सुब्बा राव, पी. परमेश्वरन, हरीश एन. साळवे, एन. डी. गर्ग, राजीव के. गर्ग, पी. एच. पारेख, आयेशा मिश्रा आणि एम. एन. श्रॉफ उपस्थित होते.

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. वेंकटचेलय्या यांनी दिला

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत या याचिकेद्वारे, नोंदणीकृत निर्यात गृह असलेले मेसर्स. रूप डायमंड्स, यांनी आयात आणि निर्यातीचे संयुक्त मुख्य नियंत्रक यांच्या ९.४.१९८६ आणि ५.८.१९८६ रोजीच्या निर्णयांच्या वैधतेला आव्हान देते, ज्यामध्ये आयात परवान्यांच्या अंतर्गत त्यांच्या निर्यात जबाबदाऱ्या पूर्ण केल्यावर खुले सामान्य परवाना वस्तूंच्या आयातीसाठी सहा आयात परवान्यांची पुनर्वैधता आणि पुष्टी देण्यास नकार दिला आहे. याचिकाकर्ते १९८२-८३ च्या आयात-निर्यात धोरणानुसार खुल्या सामान्य वस्तूंच्या आयातीसाठी योग्य पुष्टी देण्यासह सहा आयात इम्प्रेस्ट परवान्यांची ( हिऱ्यांची आयात

निर्यात करण्यासाठी देण्यात आलेला खास परवाना ) पुनर्वैधता करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य आदेश जारी करण्याची मागणी केलेली आहे.

ही रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या (दिवाणी) क्रमांक २५७९/१९८७ आणि २५८०/१९८७ यामधे दिलेल्या दोन निकालांमुले अपील करण्याची परवानगी मागणारी भारत सरकारची विशेष अनुमती याचिकेद्वारे प्रथमतः सुनावणीसाठी आली.

याचिकाकर्ते आयात-निर्यात धोरण, १९८२-८३ च्या उद्देशाने मान्यताप्राप्त निर्यात-गृह आहेत. त्यांनी सहा इम्प्रेस्ट परवान्यासाठी अर्ज केला आणि त्यांना ते देण्यात आले आणि ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत, (१) ३१.७.१९८२ रोजी दिलेल्या २९३२३४७ क्रमांकाच्या आयात परवान्यासाठी सी आय एफ मूल्य रु. ६५,२८,५००/-; (२) २०.८.१९८२ रोजी दिलेल्या २९३२५९ क्रमांकाच्या आयात परवान्यासाठी रु. १,१४,४९,२६३/-; (३) ११.५.१९८२ रोजी दिलेल्या ०४७०५३८ क्रमांकाच्या आयात परवान्यासाठी रु. १,४३,७६,७७०/-; (४) १२.५.१८२ रोजी दिलेल्या ०४४९६०४ क्रमांकाच्या आयात परवान्यासाठी रु. १,३२,३९,१३०/-; (५) १६.४.१९८२ रोजी दिलेल्या ०४६८३९७ क्रमांकाच्या आयात परवान्यासाठी रु. ५,२१,७४७ /-; आणि (६) २९.४.१९८० रोजी दिलेल्या २९२७६०७ क्रमांकाच्या आयात परवान्यासाठी रु. १,४७,१६,२३८/-. सदरचे परवाने हे त्यांना त्या परवान्यामध्ये नमूद केलेल्या अखंड आणि ओबडधोबड हिऱ्यांच्या आयातीसाठी व पुढे कापलेल्या अवस्थेतील आणि पॉलिश्ड ( घासून

चकाकीत केलेले ) व त्या परवान्यानुसार निर्धारित केलेल्या एफ ओ बी मूल्याइतकी, भारताबाहेर निर्यातीसाठीची बांधीलकि पूर्ण करण्यासाठीच्या हेतूने, देण्यात आले आहेत.

याचिकाकर्त्यांचा असा दावा आहे की, या परवान्यांच्या अनुषंगाने, त्यांनी अखंड व ओबड-धोबड हिरे आयात केले होते आणि रिट याचिकेस परिशिष्ट ५ म्हणून जोडलेल्या रिडेम्पशन ( विमोचन ) प्रमाणपत्रात दर्शविल्याप्रमाणे, आवश्यक मूल्याचे, तुकड्याच्या स्वरूपात आणि पॉलिश्ड म्हणजेच घासून लखलखीत केलेले हिरे, निर्यात करून त्यांनी त्याची निर्यातीची जबाबदारी देखील पार पाडली होती.

३. याचिकाकर्त्यांचा असा दावा आहे की आयात निर्यात धोरण, 1982-83 च्या परिच्छेद 185 (4) नुसार ते ए-एम १९८३ धोरणाच्या परिच्छेद १८५ च्या कलम (१) आणि (३) अंतर्गत निर्यात गृहांना जारी केलेल्या पूर्तता परवान्यांच्या बाबतीत उपलब्ध असलेल्या ओजीएल वस्तूंच्या आयातीसाठी असणाऱ्या पुनः पूर्ती प्रमाणपत्रासाठी पात्र होते .

---

(४) वरील उपपरिच्छेद (३) मध्ये उपलब्ध असलेल्या ओजीएल वस्तूंच्या आयातीची सुविधा, निर्यात गृहांना, त्यांच्या आगाऊ / इम्प्रेस्ट परवान्यांच्या अनुषंगाने गुणवत्तेच्या आधारावर, परवानगी दिली जाऊ शकते, आणि पुढे मग ज्यामुळे ते आरईपी परवाना घेण्यास अपात्र ठरतात. तथापि, अशा प्रकरणांमध्ये, ओ जी एल आयातीस तितक्याच मूल्यापर्यंत परवानगी दिली जाऊ शकते कि जेवढे आर ई पी परवान्यासाठी पात्र ठरू शकले असते, आणि जर त्यांनी आगाऊ / इम्प्रेस्ट परवाना प्राप्त केला नसता. निर्यात

गृहाने लादलेली निर्यातीची जबाबदारी पार पाडल्यानंतर, ही सुविधा उपलब्ध होईल. त्यामुळे निर्यात गृह या सुविधेसाठी पात्र ठरल्यास, आगाऊ / इम्प्रेस्ट परवान्याची मुदत संपली असेल किंवा त्या वेळेपर्यंत वापरात नसलेली मूळ वैधता सहा महिन्यांपेक्षा कमी असेल तर परवाना प्राधिकरण एकाच वेळी परवाना पुन्हा वैध करेल जेणेकरून परवानाधारकाला या सुविधेअंतर्गत ओजीएल वस्तू आयात करण्याच्या उद्देशाने सहा महिन्यांची मुदत मिळेल.

तथापि, याचिकाकर्त्यांनी त्यानंतर बराच काळ ओजीएल वस्तूंसाठी पुनर्वैधता आणि पुष्टी मिळविण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. सन १९८६ मध्येच त्यांनी अशा प्रकारची पुनर्मान्यता व पुष्टी मागितली. त्यांच्या निर्यात-जबाबदाऱ्या पूर्ण झाल्यापासून अनेक वर्षे उलटून गेल्यानंतर ही कार्यवाही त्यांच्याकडून करण्यात आली. आयात आणि निर्यात सहमुख्य नियंत्रकांनी आपल्या दोन निर्णयांद्वारे, एक दिनांक 5.8.1986 रोजी इम्प्रेस्ट लायसन्स 2927607 दिनांक 29.4.1980 आणि दुसरा दिनांक 9.4.1986 रोजीचा, इतर पाच इम्प्रेस्ट-परवान्यांशी संबंधित आहे. या दोन्ही आदेशांना रिट याचिकेत आव्हान देण्यात आले आहे.

दोन्ही निर्णयांमधील काही प्रासंगिक तारखांचा संदर्भ सोडून नकाराची कारणे समान आहेत. कारणे, मुख्यतः, दोन पैलूंवर आहेत. पहिले पुनर्वैधता आणि पुष्टी मिळविण्यासाठी अवाढव्य विलंबाशी संबंधित आहे. यावर पुढीलप्रमाणे विवेचनामध्ये नमूद केले आहे:

"आम्हाला आश्चर्य वाटते कि आम्हाला दिनांक २१.४.१९८६ रोजी तुमचे पत्र क्रमांक निरंक प्राप्त झाले व त्यासोबत आयात परवाना क्रमांक २९२७६०७ दिनांक

२९.४.१९८० (विदेशी चलन नियंत्रण प्रत) परवान्याची मुदत संपल्यानंतर 5 वर्षांनंतर 1982-83 या कालावधीसाठी आयात धोरणाच्या परिच्छेद 1985 नुसार परवाना रद्द न करता ओजीएल वस्तूंच्या आयातीसाठी पुनर्वैधात आणि पुष्टीकरण प्रदान करणे ज्यासाठी निर्यात दायित्व कालावधी २५.१०.८०, २२/२५.१०.८०, २९.१०.८०, १९.५.८१, ५.५.८१, २२.६.८१, ५.५.८१, २०.५.८१, २९.६.८१ आणि २२.९.८१ एएम ८३ या कालावधीसंदर्भात प्राप्त झाला. दुसऱ्या शब्दात, आपण निर्यात दायित्वच्या निर्वहनापासून 4 वर्षे आणि 7 महिन्यांनंतर एएम 83 धोरणाच्या परी 185 अंतर्गत पुनर्वैधता आणि समर्थनासाठी विनंती केली आहे. त्यामुळे निर्यातीची जबाबदारी पार पाडल्यानंतर लगेचच अर्ज करण्याची तसदी आपण घेतलेली नाही हे उघड आहे आणि त्यामुळे तुमची विनंती अत्यंत कालबाह्य आहे....”

दुसरा पैलू म्हणजे दाव्याचे गुणवत्ता आणि परवानगी याबाबतचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे “...त्याशिवाय, एएम ८३ आयात धोरणाच्या परिच्छेद १८५(७) च्या संदर्भात, सदरील धोरणाच्या परिच्छेद १८५ च्या उप-परिच्छेद (४) आणि (५) च्या तरतुदींनुसार निर्यात गृहांनी ओजीएल वस्तूंची आयात ही मालांची शिपमेंट ( पाठ्वणक्यासाठीची सज्जता) ओजीएल च्या वैधतेत म्हणजेच ३१.३.८६ किंवा आयात परवान्याच्या वैधतेच्या कालावधीत (सवलत कालावधीशिवाय) जी आधी असेल त्या तारखेपर्यंत होणे आवश्यक आहे आणि हि अट बंधनकारक आहे. ही तारीख आता संपली असल्याने आणि निर्यात जबाबदारी सोडल्यानंतर ४ वर्षे आणि ७ महिन्यांनंतर विनंती केली असल्याने, वरील तरतुदी अंतर्गत सुविधा देण्याचा

प्रश्न उद्भवत नाही. त्याशिवाय, आयात-निर्यात प्रक्रियेत १९८५-८६ कालावधीसाठी पुनर्वैधता देण्याची कोणतीही तरतूद नाही, ज्या कालावधीत तुमची विनंती प्राप्त झाली आहे. सदरील प्रक्रियेच्या परिच्छेद ७३ मध्ये असे म्हटले आहे की, सीसीपीसाठी आपत्कालीन परवान्यांच्या आयात परवान्यांची कोणतीही पुनर्वैधता अनुमती दिली जाणार नाही....”

ही रिट याचिका या आदेशांना आव्हान देते. याचिकाकर्ते दावा करतात की, त्यांचे दावे मेसर्स रिपल कुमार आणि कंपनी आणि मेसर्स एच. पटेल आणि कंपनी यांनी केलेल्या दाव्यांसारखेच आहेत, ज्यांनी मुंबई उच्च न्यायालयात आयात परवान्यांची पुनर्वैधता करण्यासाठी अधिकाऱ्यांना योग्य आदेश जारी करण्यासाठी अनुक्रमे क्रमांक २४७७/१९८४ आणि क्रमांक १४६५/१९८४ रिट याचिका दाखल केल्या होत्या. त्या रिट याचिका उच्च न्यायालयाच्या माननीय एकल न्यायाधीशांनी मान्य केल्या , ज्यांचे निर्णय खंडपीठाने अपीलमध्ये कायम ठेवले; भारत सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या सदर दोन निकालांविरुद्ध अनुक्रमे क्रमांक ४६७०/१९८६ आणि ७३८९/१९८५ विशेष अनुमती याचिका दाखल केल्या, त्या या न्यायालयाने फेटाळल्या आणि त्यामुळे, या प्रकरणांमध्ये पुनर्वैधता आणि पुष्टी देण्याच्या पार्श्वभूमीवर, अधिकाऱ्यांनी याचिकाकर्त्यांच्या सहा आयात परवान्यांची पुनर्वैधता करण्यासाठी आणि ओजीएल वस्तूंसाठी पुष्टी देण्याची मागणी फेटाळणे हे भेदभावपूर्ण आणि अनुच्छेद १४ चे उल्लंघन असेल. याचिकाकर्त्यांसाठी असे म्हटले आहे की, मेसर्स रिपल कुमार आणि कंपनी आणि मेसर्स एच. पटेल आणि कंपनी यांच्या बाबतीत अधिकाऱ्यांनी नकाराची जी कारणे पुढे केली ती याचिकाकर्त्यांच्या बाबतीत पुढे केलेल्या कारणांशी अगदी समान

आहेत आणि नकाराला आधार देण्यासाठी न्यायालयांनी ही कारणे कायद्यात अपुरी असल्याचे आढळले आहे. याचिकाकर्ते म्हणतात की, त्यांनी मेसर्स रिपल कुमार आणि कंपनी यांच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर तातडीने पुनर्वैधतेची मागणी केली आणि याचिकाकर्त्यांच्या दाव्याचा नकार हा पूर्णपणे भेदभावपूर्ण आहे, कारण याचिकाकर्त्यांच्या प्रकरणात कोणतेही भेदभाव करण्यासाठी कोणताही आधार नव्हता.

अस्वीकारासाठीच्या कारणांच्या गुणांपासून पूर्णपणे वेगळे - ज्यावर असे म्हणता येणार नाही की मेसर्स रिपल कुमार अँड कंपनी आणि मेसर्स एच. पटेल अँड कंपनी यांच्या प्रकरणांमध्ये विशेष अनुमती याचिका फेटाळल्यामुळे, या अपील करण्यात आलेल्या निर्णयांच्या शुद्धतेवर या न्यायालयाचा शिक्कामोर्तब आहे. - आणखी एक आधार आहे जो मूलभूतपणे सध्याच्या प्रकरणाला वेगळे ठेवतो. याचिकाकर्ते असे दावे पुन्हा एकदा मांडत आहेत जे त्यांनी अनेक वर्षे त्याचा पाठपुरावा केला नव्हता . याचिकाकर्ते सतर्क नव्हते परंतु निष्क्रिय राहण्यास समाधानी होते आणि त्यांनी दुसर् या कोणाच्या खटल्याचा निकाल लागेपर्यंत कुंपणावर बसणे पसंत केले. ज्या कायद्याला न्यायालयाने घटनाबाह्य आणि अमान्य ठरवले आहे, अशा कायद्याच्या सक्तीने दिलेले पैसे, नंतर अमान्य घोषित करण्यात आले आहेत, अशी वसुली करता यावी, यासाठी अशा प्रकारच्या कायद्याचा विचार केला जाऊ शकत नाही. पहिल्या फेटाळणीनंतर जवळपास वर्षभरानंतर दाखल केलेल्या  या रिट याचिकेला प्राधान्य देण्यासही अनाठायी, कमालीचा उशीर होत आहे. मेसर्स रिपल कुमार अँड कंपनी आणि मेसर्स एच पटेल अँड कंपनीच्या खटल्यातील आदेशावरून असे दिसून येते की,

पूर्वीच्या प्रकरणात १६.११.१९८३ च्या रिडेम्प्शन सर्टिफिकेटच्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत १२.३.१९८४ रोजी पुनर्वैधता आणि पुष्टीसाठी  अर्ज करण्यात आला होता. १९८३ आणि नंतरच्या प्रकरणात २०.६.१९८४ रोजी ९.३.१९८४ च्या रिडेम्प्शन सर्टिफिकेटमधून सुमारे तीन महिन्यांत पुनर्वैधतेचा अर्ज दाखल करण्यात आला.

६. या विषयावर विचार केल्यानंतर आम्हाला असे वाटते की, नकाराची इतर कारणे कितीही योग्य असली तरी, अधिकाऱ्यांकडे दाव्यात आणि या न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात झालेला अवाढव्य विलंब हा स्वतःहूनच आम्हाला हस्तक्षेप करण्यास नकार देण्यास प्रवृत्त करणारा आहे.

दुर्गाप्रसाद विरुद्ध मुख्य नियंत्रक, आय. आणि ई. १९६९ (२) एस्. सी. आर ८६१ या प्रकरणात या न्यायालयाने असे निरीक्षण केले कि:

> “...या देशाची विनिमय स्थिती आणि आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी शासनाची धोरणे दरवर्षी बदलत असतात हे सर्वज्ञात आहे आणि १९५९ किंवा १९६२ मध्ये शासनाने केलेल्या कथित अपराधांच्या संदर्भात या न्यायालयाने १९६८ मध्ये आयात परवाना देण्याचे निर्देश देणे हे अत्यंत विचित्र ठरेल. या बाबतीत असे आवश्यक आहे की, शासनाच्या आदेशांमुळे ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांनी कायदा, नियम किंवा

आदेशाने प्रदान केलेली उपाययोजना पूर्णपणे वापरल्यानंतर उच्च न्यायालयात अत्यंत जलदगतीने अपील करावे.”

याचिकाकर्त्यांच्या दाव्यास नकार देणाऱ्या दोन विवेचनात  असे नमूद करण्यात आले आहे की, धोरणात अपील-प्रक्रियानुसार निर्धारित केल्याप्रमाणे याचिकाकर्त्यांना अपिलाचा हक्क आहे. जर असा कोणताही अपिलाचा अधिकार उपलब्ध असेल, तर या रिट-याचिका फेटाळण्याच्या या आदेशामुळे अशा कोणत्याही अपीलात याचिकाकर्त्यांच्या प्रकरणावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

८. त्यानुसार, आम्ही हस्तक्षेप करण्यास नकार देतो आणि ही रिट याचिका फेटाळतो.

याचिका फेटाळली.

-x-x-x -

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-